आनंद ए. रायते, भा.प्र.से.
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई

अ.शा.पत्र. क्रमांक राज्य सीईटी कक्ष./व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०१९/१४५९/२०१८
आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
८ वा मजला, न्यू एक्सेल्सिअर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६१५७/५९

दिनांक: २४/१०/२०१८

विषय: शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता इच्छुक उमेदवारांना राष्ट्रीयत्व व रहिवास प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमी लेयर प्रमाण पत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र व अन्य प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्याबाबत .......

प्रिय सर्व जिल्हाधिकारी, / विभागिय आयुक्त,

महाराष्ट्र विनानुदानित खाजगी व्यवसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची स्थापना करण्यात आली असून, अभियांत्रिकी (BE, B.Tech. /ME, M.Tech), औषधनिर्माणशास्त्र (B.Pharm, Pharm D/ M.Pharm), वास्तुशास्त्र (B.Arch/M.Arch), हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नोलॉजी (B.HMCT/M.HMCT), व्यवस्थापन शास्त्र (MBA/MMS), एमसीए (MCA), कला शिक्षण (फाईन आर्ट/ अप्लाईड आर्ट), वैद्यकीय (MBBS, B.D.S, /MD, MS), कृषी (B.Sc Agri, B.Tech Agri) ,शिक्षणशास्त्र (B.Ed, M.Ed), BA/B.Sc-B.Ed, B.Ed-M.Ed (एकात्मिक) विधी (LLB) (३ वर्ष व ५ वर्ष एकात्मिक अभ्यासक्रम), मत्स्यकी (फिशरी ), शारीरिक शिक्षण (B.P.Ed/M.P.Ed), आयुर्वेद (BAMS)/ होमिओपॅथी (BHMS)/ युनानी (BUMS) / फिजिओथेरपी (B.PTh) इ. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शासकीय, शासन अनुदानित आणि खाजगी विनानुदानित महाविद्यालयांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्याची जवाबदारी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची आहे.

या प्रवेश प्रक्रिया प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरु होतात. या प्रवेश प्रक्रियांचे online अर्ज भरते वेळीच उमेदवाराकडे आपल्या कार्यालयातून जारी करण्यात येत असलेले राष्ट्रीयत्व व रहिवास प्रमाणपत्र (राज्याचा अधिवास असलेल्या सर्व उमेदवारांना),एस. सी. एस.टी. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य राखीव प्रवर्गातील उमेदवारांना Non Creamy Layer Certificate व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना (खुल्या गटातील प्रवर्गासह सर्व प्रवर्गातील उमेदवारांना) उत्पन्नाचा दाखला अर्जा सोबत अपलोड करणे आवश्यक आहे. कृषी/मत्स्यकी अभ्यासक्रमाकरिता वरील प्रमाणपत्रांसह ७/१२ उतारा (७/१२ Extract), भूमिहीन कृषी मजूर असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Landless Agricultural Labour), मच्छिमार असल्याचे प्रमाणपत्र (Certificate of Fisherman), शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र (Certificate of Agriculturist) व प्रकल्पबाधित असल्याचे प्रमाणपत्र या प्रमाणपत्रांची देखील आवश्यकता असते.

अनेक विद्यार्थी सदर प्रमाणपत्रे त्यांना जिल्हा प्रशासनाकडून वेळेत उपलब्ध होत नसल्याबाबत या कार्यालयात तसेच वरिष्ठ कार्यालयात तक्रारी करतात व त्यामुळे सदर उमेदवार त्यांच्या प्रवर्गातून अर्ज दाखल न करू शकल्याने त्यांना त्यांच्या प्रवर्गाचे लाभ मिळत नाहीत व उमेदवाराचे आयुष्यभराचे नुकसान होते. तसेच जनमानसातील शासकीय यंत्रणेची प्रतिमा देखील मलीन होते.

वरील बाबी विचारात घेता आपणास अशी विनंती आहे की वरील प्रमाणे दाखले मागणारे अर्ज आपल्या कार्यालयाकडून प्राधान्याने व अति जलद गतीने ५ जून अखेर जारी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला, स्वाक्षरित

(आनंद एकनाथ रायते, भा.प्र.से.).

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,

प्रत:

१. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, यांना माहिती करिता सादर
२. मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग
३. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
४. मा. विभागीय आयुक्त: पुणे, कोकण,औरंगाबाद, नाशिक, अमरावती , नागपुर